जळगाव : महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना अनुभवी शिक्षणावर देखील भर देवून विद्यार्थ्यांनी आयुष्यात प्रगती केली पाहिजे असे प्रतिपादन विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.टी.महाजन यांनी केले.

मू.जे.महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे २०१६-१७ मध्ये महाविद्यालयातून गुणवंत झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी भूगोल विभागाच्या प्रमुख व कला शाखेच्या समन्वयिका डॉ.प्रज्ञा जंगले, विभाग प्रमुख डॉ.के.पी.नारखेडे उपस्थित होते.

यावेळी डॉ. प्रज्ञा जंगले यांनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देत, मिळालेल्या शिक्षणातून स्वतासह इतरांनाहि रोजगाराच्या वाटा उपलब्ध करून द्याव्या असे आवाहन केले. सूक्ष्मजीवशास्त्रात पदवीच्या पहिल्या वर्षात प्रथम महिमा सेठिया, द्वितीय वर्षात प्रथम नेहा गिरी, तृतीय वर्षात प्रथम प्रफुल्ल शर्मा हे तर पदव्युत्तर मध्ये पहिल्या वर्षात प्रथम पल्लवी पाटील तर दुसर्या वर्षात प्रथम प्रीती मिस्तरी हे आलेत. त्यासह विशेष पारितोषिकाने प्रियांका चौधरी आणि प्रियांका बोरसे या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

प्रस्तावना डॉ. के.पी.नारखेडे यांनी, सूत्रसंचालन कल्पेश महाजन व पल्लवी पाटील यांनी केले. आभार डॉ.लीना ढाके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी एस.जे.चंद्रात्रे, एस.पी.पाटील, सचिन चन्नावत, निकिता ठाकूर, प्रेरणा ठाकूर, समाधान पाटील, दिलीप परदेशी, आर.बी.सरोदे, महेश पाटील, डीगंबर नारखेडे यांनी परिश्रम घेतले.

प्रति,

मा.संपादक, वरील वृत्त आपल्या दैनिकात देऊन सहकार्य करावे, हि विनंती.

**प्रा.विश्वजीत चौधरी.**

**प्रसिद्धी समिती चेअरमन**

**९४२०३८३७७८.**



